पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - १२**

**सभावृत्तात**

दिनांक :- १७ / १० / २०१२ वेळ :- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १७ / १० / २०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय- सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. यमुनाताई रमणनाना पवार
४) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ

याशिवाय मा.गावडे - सहा.आयुक्त, मा. चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.पाटील, मा.तांबे, मा.ढगे - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**दिनांक ०३/१०/२०१२ व ०५/१०/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ११ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

ठराव क्रमांक :- ६२ विषय क्रमांक : १
दिनांक :- १७/१०/२०१२ विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा. नितीन काळजे अनुमोदक :- मा. सुरेश म्हेत्रे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/२ब/च-होली/७६/२०१२, दि.३०/०९/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे च-होली येथील स.नं.३४४ पै, ३४५ पै, ३४६ पै, मधील भागशः मंजूर विकास योजनेतील १८.०० मी.रस्ता आखणीत फेरबदल करणेचा प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये शासनास मान्यतेकामी पाठविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / १३७२ / २०१२
दिनांक :- १७ / १० / २०१२

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत :- सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१/shsu-११-१२\proceeding१२doc